MHKO100003302019

**दिवाणी दावा क्र. ५५/२०१९ मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश**

वादी यांनी सदरचा अर्ज वादी क्र. २ शामराव संतू पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र. २ शामराव संतू पाटील हे दिनांक १४/०७/२०२४ रोजी मयत झाले असून अर्जात नमुद वारस हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत.

**४.** प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, अर्जातील कथने प्रतिवादी नाकारत आहेत. वादीने कायदेशीर वारसांबाबत पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

**५.** अर्जदार यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या अर्जाचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वादी क्र. २ शामराव संतू पाटील यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. सबब अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अर्जदार यांचा निशाणी क्र. ३४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२)     अर्जदार यांनी अर्जात योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2024.11.27
16:05:10 +0530

ठिकाण – गडहिंग्लज                                        डी. एम. पवार
दिनांक २६/११/२०२४                    दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज